# Greenlawns School, Worli

वार्षिक परीक्षा (द्वितीय सत्र २३-२४)

मराठी

इयत्ता :- ८ वी पूर्णांक:- ८०

दिनांक:- २३.०२.२०२४ वेळ –२ तास

सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

---

प्रश्न १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)

१. मला देव भेटला तर...

२. माझा महाराष्ट्र

३. फाटक्या पुस्तकाची आत्मकथा

प्रश्न २) खालील दिलेल्या विषयावर पत्र लिहा : (७)

आठ दिवसांची रजा मंजूर व्हावी, त्यासाठी विनंती करणारे पत्र तुमच्या मुख्याध्यापकांना लिहा.

प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

चैत्र महिन्यात नव्या मराठी वर्षाची सुरुवात होते. निसर्ग आणि पशुपक्षी या सर्वांनाच वसंतऋतूची चाहूल देणारा हा दिवस वर्षारंभाचा दिवस मानला गेला. वर्षाच्या सुरुवातीच्या हा महत्त्वाच्या दिवस लोक आनंदाने साजरा करतात. हा पहिला दिवस म्हणजेच चैत्र शुद्ध प्रतिपदा. गुढीपाडवाच्या मंगल दिवस. साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त मानला जातो, म्हणूनच एखाद्या चांगल्या कार्याची सुरुवात पाडव्यापासून केली जाते.

P.T.O

'नववर्ष' म्हणून गुढी उभारली जाते. एक सरळ, उंच, साधी किंवा वेताची काठी घेतात. त्याच्या वरच्या टोकाला चांदीचे किंवा तांब्याचे किंवा पितळी भांडे पालथे घालतात. त्याच्यावर सुंदरसे रेशमी वस्त्र घालून कडुलिंबाची डहाळी आणि बत्ताश्यांची माळ घालतात. हीच गुढी होय. गंध,फुले वाहून पूजा करतात. त्यासाठी गूळ खोबरयाचा नैवेद्य दाखवितात.

गुढीपाडव्यापासून शालिवाहन संवत्सराची सुरुवात झाली. फार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. पैठणमध्ये प्रतिष्ठानपुर नगर होऊन गेले. तेथे एक राजा होऊन गेला. शालिवाहन असे त्याचे नाव होते. राजा अतिशय पराक्रमी, न्यायी आणि शूर होते. याच काळात राजा शक आणि त्याचे सैन्य वेळोवेळी राज्यावर स्वारी करून जनतेची लूट आणि छळ करीत असे. अशा या 'शक' राजावर शालिवाहन राजाने स्वारी केली व त्याचा पराभव केला. त्यामुळे लोकांचे हाल कमी झाले. लोकांना आनंद झाला. शालिवाहनाच्या पराक्रमाचा हाच 'विजय दिन' होय. म्हणूनच विजयाचे प्रतीक म्हणून गुढी उभारण्यात येऊ लागली. हाच तो चैत्र पाडव्याच्या दिवस.याच दिवसापासूनच शालिवाहन शक वर्षाची सुरुवात झाली. गुढीपाडव्याच्या या दिवशी सर्वजण एकमेकांना शुभेच्छा देऊन नववर्षाचे स्वागत करतात.

प्रश्न :-

१. चैत्राच्या पहिल्या दिवसाचे महत्त्व लिहा. (२)
२. गुढी कशी उभारतात ? (२)
३. शालिवाहन राजाचे राज्य कुठे होते ? राजा कसा होता ? (२)
४. गुढी ही कशाची प्रतीक म्हणून उभारली जाते व का ? (२)
५. वाक्य बनवा - उत्साह, शुभेच्छा (२)

## <u>व्याकरण - विभाग</u>

प्रश्न ४) खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा :-

१. समानार्थी शब्द लिहा - चिमुकली, अश्व, रौद्र (३)

२. विरुद्धार्थी शब्द लिहा - स्वस्त, प्रचंड, मुख्य (३)

३. लिंग बदला - संशोधक ,अधिकारी, मोकळा (३)

४. वचन बदला - खांदा ,दुरुस्ती, निरोप (३)

५. रेखांकित अव्ययचा प्रकार लिहा :- (१)

<u>शाब्बास</u>! चांगले काम केलं तेजस तू .

<u>साहित्य - विभाग ( Marks – ४० )</u>

प्रश्न ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (१२)

१. लेखकाने सांगितलेले व्यायामाचे महत्त्व स्पष्ट करा?

२. ईशानची गुणवैशिष्ट्ये लिहा ?

३. 'खेळ आपल्याला स्वावलंबी बनवतो व निर्णय क्षमता वाढवतो' हे स्पष्ट करा?

४. ईशान आणि त्याचे सहकारी यांनी यात्रेकरूंना कोणती मदत केली ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (४)

१. मुले वर्गात जाऊन कशाची घोषणा करणार ?

२. ईशानला कोणत्या गिर्यारोहण संस्थेकडून ईमेल आला होता?

३. लेखक कोणत्या गावात शिकले होते ?

४. लेखकाला कोणता पुरस्कार मिळाला होता ?

इ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा - (३)

१. त्यांना हवी तशी झाडं पाडतात आणि .......... लावतही नाही.

२. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना ----------- शिकवतो.

३. शिवाय थोडे पुढे गेल्यावर '------------' नावाचा डोंगर आहे.

P.T.O

ई) कोण - कोणास म्हणाले :- (३)

१. “अरे,तिथे ना मोठी बिल्डिंग होणार आहे.”

२.“ ते तर किती जुनं आणि मोठ्ठं झाड होतं.”

३. “ आपण झाडे लावू या.”

उ) शब्दार्थ लिहा :- अंगावर काटे येणे,सबब, गडप, रौद्ररूप , नजराणा, आपसूक (३)

## <u>कविता – विभाग</u>

प्रश्न ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

१. संत चोखामेळा यांनी संतांविषयी काय म्हटले आहे ?

२. ‘आम्ही चालू हा पुढे वारसा’ कविताचे कवी कोण व त्यांनी या कवितेतून कोणता संदेश दिला आहे ?

आ) खालील दिलेल्या कवितेच्या ओळी पूर्ण करा:- (४)

जरी ---------------------<br>
-----------------------------<br>
---------------------------<br>
---------------------------- अशी.

इ) शब्दार्थ लिहा : खर , टाकळी, ठावे , आस , अभाविक , हेकळी (३)

ई) शुध्द शब्द लिहा :- अंकूर , परमारथ (२)

******* समाप्त *******